सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

जानेवारी २०२६ । पृष्ठे : ५२

# महाराष्ट्र आरोग्य पत्रिका



## आरोग्याचा ध्यास, महाराष्ट्राचा विकास



# 'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहीम


























सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

मुख्य संपादक :
**डॉ. विजय कंदेवाड**
संचालक आरोग्य सेवा,पुणे

संपादक :
**डॉ.कैलास बाविस्कर**
उपसंचालक,
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे

संपादन सहाय्य :
**डॉ. संजयकुमार जठार**
सहायक संचालक, आरोग्य सेवा
**प्रशांत तुपकरी**
आरोग्य शिक्षण अधिकारी

**e-आवृत्ती**
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग
'परिवर्तन, आरोग्य भवन,
विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६

पत्रव्यवहारासाठी पत्ता

संपादक,
राज्य आरोग्य शिक्षण व
संपर्क विभाग
'परिवर्तन', आरोग्य भवन परिसर,
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६.
दूरध्वनी : ०२०-२६६१०१७८,
२६६१०१७९.
फॅक्स : ०२०-२६६१०१८०

e-mail :
ddhsiec.creatives@gmail.com

महाराष्ट्र
# आरोग्य पत्रिका

वर्ष : अठ्ठाविसावे | अंक : १ | महिना : जानेवारी २०२६



## समर्पण भावना

## मोबाईल हेल्थ

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे द्वारा प्रकाशित

https://www.facebook.com/MahaArogyaIECBureau

https://twitter.com/MahaHealthIEC

https://www.instagram.com/mahahealthiec/

http://bit.ly/MahaArogyaYT

https://www.linkedin.com/company/maha-arogya-iec-bureau

संकेत स्थळ :
http://maha-arogya.gov.in
http://mahaarogyasamvadiec.in
maharogyasamvad

महाराष्ट्र
आरोग्य पत्रिका

जानेवारी - २०२६

# अंतरंग


- आयुक्तांचे मनोगत ..... ५
- संचालकांचे मनोगत (मुंबई) ..... ६
- संचालकांचे मनोगत (पुणे) ..... ७
- संपादकीय ..... ८
- समर्पण भावना ..... ९
- राज्य आरोग्य धोरण आणि आरोग्य पर्यटन संकल्पना ..... १०
- रिक्त पदांची भरती ..... ११
- खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम /लॅब ॲक्टद्वारे खासगी लॅबवर नियंत्रण ..... १२
- ब्लड बँकेवर नियंत्रणासाठी टास्क फोर्स ..... १३
- राज्यस्तरीय कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम ..... १४
- पीसीपीएनडीटी कायद्याची कठोर अंमलबजावणी ..... १५
- रुग्णालयांना अचानक भेटी ..... १६
- अत्यावश्यक व गरजेच्या औषधांचा नियमित पुरवठा ..... १७
- औषधे व उपकरणे मानक कार्यप्रणाली (एसओपी) ..... १८
- ५० टक्के बांधकाम पूर्ण झाल्यावर पद निर्मिती ..... १९
- मानसिक रुग्णालय ..... २०
- महानगरपालिकांच्या रुग्णालयांमध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा समावेश ..... २१
- आरोग्य दिनी सन्मान आणि सत्कार ..... २२
- दिव्यांग बांधवांसाठी दिव्यांग प्रमाणपत्र सेवा ..... २३
- e-Sushrut (HMIS System) संकेतस्थळाचे विस्तारीकरण ..... २४
- महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी प्रणालीचे ऑनलाईन प्रमाणपत्र वितरण (Bombay Nursing Home Act) ..... २५
- राज्यातील डायलिसीस युनिट्सची सुरुवात ..... २६
- गर्भाशयमुख कर्करोग जनजागृती अभियान (९ ते १४ वर्षे वयोगट) ..... २७
- महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालयांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा शुभारंभ ..... २८
- आरोग्य सुविधांचे लोकार्पण ..... २९
- 'नो शॉर्टेज, नो वेस्टेज' धोरण ..... ३०
- मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यात सुधारणा आणि अंगदान जनजागृती उपक्रम ..... ३१
- आषाढी वारी विशेष आरोग्य उपक्रम 'भक्ति विठोबाची, सेवा आरोग्याची' ..... ३२-३३
- स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान व्यापक आरोग्य तपासणी ..... ३४
- कुष्ठरोग 'नोटिफायबल डिसीज' म्हणून घोषित ..... ३५
- अंगीकृत रुग्णालयांसाठी १०८ रुग्णवाहिका आणि जलद क्लेम प्रक्रिया ..... ३६
- यांत्रिक वस्त्र धुलाई सेवेद्वारे शासकीय रुग्णालयांमध्ये स्वच्छता व सुरक्षितता वाढवणे ..... ३७
- महात्मा फुले जनआरोग्य योजनेत १० लाख रुपयांपर्यंत उपचाराची हमी ! /
  महात्मा फुले जन आरोग्य' योजनेत उपचारांची संख्या दुप्पट ..... ३८
- आयुष्मान कार्ड निर्मिती व वितरण करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात मोठी वाढ ! ..... ३९
- एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे.../ नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान ..... ४०
- राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी ऐतिहासिक दिलासा !
  औषधी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा तसेच RT-PCR रेण्विय चाचणी सुविधा प्रयोगशाळांची निर्मिती ..... ४१
- सिकलसेलमुक्त महाराष्ट्रासाठी 'अरुणोदय' विशेष तपासणी मोहीम ..... ४२
- पॅलिएटिव्ह केअर विशेष मोहीम ..... ४३
- हत्तीरोग सार्वत्रिक औषधोपचार मोहीम / एन.आय.व्ही.'च्या धर्तीवर राज्यात एम.आय.व्ही. प्रयोगशाळा ..... ४४
- वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार ..... ४५
- आशा कौशल्य विकास कार्यक्रम ..... ४६
- **वृत्त विशेष :** 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान ..... ४७
- **वृत्त विशेष :** सिकलसेलमुक्त भविष्यासाठी जनतेने तपासणी करून घ्यावी ..... ४८
- **वृत्त विशेष :** राज्यात 'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहिमेला प्रारंभ ..... ४९
- लेखकांना विनंती ..... ५०
- 'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहीम ..... ५१




१३ ब्लड बँकेवर नियंत्रणासाठी टास्क फोर्स



१६ रुग्णालयांना अचानक भेटी



२२ आरोग्य दिनी सन्मान आणि सत्कार

# आयुक्तांचे मनोगत



नवीन वर्षाची सुरुवात ही आत्मपरीक्षण, संकल्प आणि नव्या उमेदीने पुढे जाण्याची संधी असते. मागील वर्षभरात सार्वजनिक आरोग्य विभागाने "आरोग्याचा ध्यास, महाराष्ट्राचा विकास" या ब्रीदवाक्याला केंद्रस्थानी ठेवून लोकाभिमुख, पारदर्शक आणि परिणामकारक कामगिरी केली आहे. राज्यातील शहरी, ग्रामीण, दुर्गम आणि अतिदुर्गम भागातील नागरिकांपर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा पोहोचविण्याचा निर्धार या कामगिरीतून स्पष्टपणे दिसून येतो.

गेल्या वर्षभरात आरोग्य सेवा व्यवस्थेचे बळकटीकरण, मनुष्यबळ सशक्तीकरण, पायाभूत सुविधा, आधुनिक वैद्यकीय साधने, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि प्रशासकीय पारदर्शकता यावर विशेष भर देण्यात आला. प्राथमिक, द्वितीयस्तरीय आणि त्रिस्तरीय आरोग्य व्यवस्थेतील समन्वय अधिक मजबूत करण्यात आला. ग्रामीण, दुर्गम आणि अतिदुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवा पोहोचविताना 'शेवटच्या व्यक्तीपर्यंत सेवा' हा मूलमंत्र कायम ठेवण्यात आला.

महिलांचे आरोग्य, मातृ-बाल संगोपन, कर्करोग प्रतिबंध, मानसिक आरोग्य, दिव्यांग पुनर्वसन, संसर्गजन्य आजार नियंत्रण, आपत्कालीन सेवा आणि रुग्ण सुरक्षा या क्षेत्रांमध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांमुळे आरोग्य सेवेची गुणवत्ता आणि विश्वासार्हता वाढली आहे. "स्वस्थ नारी – सशक्त परिवार" या अभियानातून महिलांच्या आरोग्याबाबत व्यापक सामाजिक जागृती निर्माण झाली. लोकसहभागातून राबविलेले उपक्रम, तपासणी मोहिमा, घरभेटी कार्यक्रम आणि जनजागृतीमुळे प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांना चालना मिळाली.

या भक्कम पायाभरणीवर उभे राहून नवीन वर्षाची सुरुवात सिकलसेल ॲनिमिया तपासणी विशेष मोहिमेद्वारे करण्यात आली आहे. सिकलसेल हा अनुवांशिक रक्तविकार असून, त्याचा प्रभाव काही विशिष्ट भागांमध्ये अधिक आहे. या पार्श्वभूमीवर जनजागृती, मोठ्या प्रमाणावर तपासणी, नवीन रुग्णांचा सक्रिय शोध, औषधांची उपलब्धता आणि नियमित फॉलो-अप या सर्व बाबींवर लक्ष केंद्रित करून ही मोहीम राबविली जात आहे. "सिकलसेलमुक्त महाराष्ट्र" हे उद्दिष्ट केवळ आरोग्य विभागाचे नव्हे, तर संपूर्ण समाजाचे सामूहिक ध्येय आहे.

नवीन वर्षात सार्वजनिक आरोग्य विभाग अधिक संवेदनशील, अधिक कार्यक्षम आणि अधिक लोकाभिमुख सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे. आरोग्य कर्मचारी, अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांचा समन्वय हा यशाचा खरा आधार आहे.

चला, या नवीन वर्षात लोकसहभाग, प्रतिबंधात्मक आरोग्य आणि गुणवत्तापूर्ण उपचार या तीन स्तंभांवर आधारित निरोगी, सक्षम आणि समावेशक महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प अधिक दृढ करू या.

**डॉ. कादंबरी बलकवडे**
आयुक्त, आरोग्य सेवा
तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

# संचालकांचे मनोगत



नवीन वर्षाची सुरुवात ही आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्याचा आणि चांगल्या सवयी अंगीकारण्याचा संकल्प करण्याची योग्य वेळ असते. जानेवारी महिन्यात साजरा होणारा धुम्रपान विरोधी दिन आणि राष्ट्रीय युवा दिन हे दोन्ही दिवस समाजाच्या आरोग्य भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. व्यसनमुक्त जीवनशैली आणि सशक्त, आरोग्यदायी युवा पिढी यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे.

धुम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन हे अनेक गंभीर आजारांचे मूळ कारण आहे. मुख कर्करोग, फुफ्फुसांचे विकार, हृदयरोग, पक्षाघात यांसारख्या आजारांचा थेट संबंध तंबाखू सेवनाशी आहे. दुर्दैवाने युवकांमध्ये धुम्रपानाची सवय लवकर वयात लागण्याचे प्रमाण वाढताना दिसते. त्यामुळे धुम्रपान विरोधी दिन केवळ एक दिवसापुरता मर्यादित न ठेवता, वर्षभर चालणारी जनजागृती मोहीम म्हणून राबविणे आवश्यक आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, शाळा-महाविद्यालयांत जनजागृती, समुपदेशन, तसेच व्यसनमुक्ती केंद्रांच्या माध्यमातून उपचार सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

१२ जानेवारी रोजी साजरा होणारा राष्ट्रीय युवा दिन हा युवकांच्या सामर्थ्याची, ऊर्जेची आणि राष्ट्रउभारणीत त्यांच्या भूमिकेची जाणीव करून देणारा दिवस आहे. युवक ही समाजाची सर्वात मोठी ताकद आहे. आरोग्यदायी, व्यसनमुक्त आणि मानसिकदृष्ट्या सक्षम युवा पिढी घडविणे ही सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची मोठी जबाबदारी आहे. शारीरिक व्यायाम, संतुलित आहार, तणाव व्यवस्थापन, सकारात्मक विचारसरणी आणि व्यसनांपासून दूर राहणे या गोष्टी युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत.

आरोग्य विभागामार्फत शालेय व महाविद्यालयीन स्तरावर आरोग्य शिक्षण, मानसिक आरोग्य जनजागृती, कर्करोग प्रतिबंध, तसेच व्यसनाधिनतेविरोधात विविध उपक्रम राबविले जात आहेत. युवकांनी आरोग्यदूत म्हणून पुढे येऊन समाजात सकारात्मक संदेश पोहोचवावा, अशी अपेक्षा आहे. स्वतः निरोगी राहणे आणि इतरांनाही निरोगी राहण्यासाठी प्रेरित करणे हीच खरी युवकांची सामाजिक जबाबदारी आहे.

या धुम्रपान विरोधी दिन आणि राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आपण सर्वांनी एकत्रितपणे संकल्प करू या, "व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारू या, सशक्त व निरोगी युवा महाराष्ट्र घडवू या."

युवकांच्या सहभागातूनच आरोग्यदायी, सक्षम आणि प्रगत महाराष्ट्राची पायाभरणी होईल, असा विश्वास आहे.

**डॉ. नितीन अंबाडेकर**
संचालक, मुंबई

# संचालकांचे मनोगत



जानेवारी महिना हा राष्ट्राच्या मूल्यांची पुनःपुन्हा आठवण करून देणारा महिना आहे. २६ जानेवारीचा प्रजासत्ताक दिन आपल्याला समानता, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाची शिकवण देतो, तर ३० जानेवारी - कुष्ठरोग निवारण दिन समाजातील एका दुर्लक्षित, पण अत्यंत महत्त्वाच्या वास्तवाकडे आपले लक्ष वेधतो. कुष्ठरोग हा केवळ वैद्यकीय प्रश्न नसून, तो आजही मोठ्या प्रमाणावर सामाजिक कलंकाशी जोडलेला आजार आहे.

आजच्या घडीला कुष्ठरोग पूर्णतः बरा होणारा आजार आहे, ही वस्तुस्थिती असूनही अनेक रुग्ण भीती, गैरसमज आणि सामाजिक बहिष्कारामुळे उपचारांपासून दूर राहतात. काही ठिकाणी आजाराची लक्षणे दिसून येत असूनही समाजाच्या प्रतिक्रियेच्या भीतीने रुग्ण तपासणीसाठी पुढे येत नाहीत. परिणामी उशिरा निदान होते आणि अपंगत्वाचा धोका वाढतो. त्यामुळे कुष्ठरोग निर्मूलनाच्या मार्गातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे रोग नव्हे, तर रोगाभोवती निर्माण झालेला कलंक होय.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कुष्ठरोगाविषयी जनजागृती, लवकर निदान, मोफत व प्रभावी औषधोपचार आणि पुनर्वसन यावर सातत्याने भर देण्यात येत आहे. आरोग्य कर्मचारी, आशा सेविका आणि प्राथमिक आरोग्य यंत्रणेमार्फत "कुष्ठरोग संसर्गजन्य नाही, उपचारानंतर रुग्ण पूर्णपणे सामान्य जीवन जगू शकतो" हा संदेश घराघरात पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र हे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या मूल्यांनुसार प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. कुष्ठरोगग्रस्त व्यक्तीला सामाजिकदृष्ट्या दूर लोटणे, नोकरी, शिक्षण किंवा समाजजीवनातून वगळणे हे मानवी मूल्यांशी विसंगत आहे. आजारामुळे व्यक्तीची ओळख ठरू नये, तर त्या व्यक्तीतील माणूसपण केंद्रस्थानी असावे, हीच समताधिष्ठित समाजाची खरी ओळख आहे.

या कुष्ठरोग निवारण दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी मिळून गैरसमज दूर करण्याची, भीतीऐवजी माहिती पसरवण्याची आणि तिरस्काराऐवजी स्वीकाराची भूमिका घेण्याची गरज आहे. सामाजिक कलंक निर्मूलनाशिवाय कुष्ठरोग निर्मूलन शक्य नाही, हे लक्षात घेऊन सार्वजनिक आरोग्य विभाग सर्वसमावेशक, संवेदनशील आणि मानवी दृष्टिकोनातून कार्यरत आहे.

निरोगी शरीरासोबत निरोगी समाज घडवणे, हाच सार्वजनिक आरोग्याचा खरा उद्देश असून, तो साध्य करण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे हीच प्रजासत्ताक दिनाची खरी भावना आहे.

**डॉ. विजय कंदेवाड**
संचालक, पुणे

# संपादकीय

आरोग्याचा ध्यास - महाराष्ट्राचा विकास या ध्येयाने सुरू झालेले कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नसून, ती समाज, राज्य आणि राष्ट्राच्या प्रगतीचा मूलभूत आधार आहे. माता, भगिनी आणि मुलींच्या आरोग्याशी निगडित प्रश्न हे येणाऱ्या पिढ्यांचे भवितव्य ठरवतात, असे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केले आहे. याच व्यापक दृष्टिकोनातून केंद्र व राज्य शासन आरोग्य क्षेत्रात सातत्याने निर्णायक पावले उचलत आहेत.

महाराष्ट्र राज्यात मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि मा. उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या सक्षम व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली सार्वजनिक आरोग्य क्षेत्राला नवी दिशा मिळाली आहे. "एकही नागरिक गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवेपासून वंचित राहू नये" या भूमिकेतून महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा झालेला विस्तार, हजारो कुटुंबांसाठी दिलासा ठरणारा आहे. हजारो आजारांवरील मोफत व दर्जेदार उपचारांची हमी ही सामाजिक न्यायाची ठोस अंमलबजावणी आहे. राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. श्री. प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मा. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागाचे कार्य अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान झाले आहे. "सुदृढ महाराष्ट्र, आरोग्यसंपन्न महाराष्ट्र" हे केवळ घोषवाक्य न राहता, प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी विभागातील प्रत्येक अधिकारी व कर्मचारी जबाबदारीने कार्य करत आहे.

मा. आरोग्य मंत्री श्री. प्रकाश आबिटकर यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनामुळे आरोग्य सेवा ही उपचारांपुरती मर्यादित न राहता, जागृती, प्रतिबंध, समुपदेशन आणि सामाजिक स्वीकार या चार स्तंभांवर उभी राहत आहे. सिकलसेल, अवयवदान, माता-बाल आरोग्य, असंसर्गजन्य आजार, मानसिक आरोग्य यांसारख्या विषयांवर घेतलेली संवेदनशील भूमिका महाराष्ट्राला देशात आदर्श राज्य म्हणून उभे करत आहे.विशेषतः अवयवदानासारख्या संवेदनशील विषयावर जनजागृतीची चळवळ उभी करण्याचा संकल्प, तसेच माता-भगिनींच्या आरोग्याला प्राधान्य देण्याची भूमिका ही "निरोगी महाराष्ट्र" घडविण्याची पायाभरणी आहे. निरोगी महिला आणि सुदृढ बालके म्हणजे देशाच्या उज्ज्वल भविष्यातील गुंतवणूक असल्याची जाणीव शासनाच्या प्रत्येक उपक्रमातून प्रकर्षाने दिसून येते.

गेल्या एका वर्षातील आरोग्य विभागाचा प्रवास हा धोरण, संवेदना आणि कार्यक्षमता यांचा सुंदर संगम आहे. "आरोग्य म्हणजे केवळ उपचार नव्हे, तर समाजाचा सर्वांगीण विकास" हा विचार केंद्रस्थानी ठेवून राबविण्यात आलेले उपक्रम महाराष्ट्राला अधिक सुरक्षित, सक्षम आणि मानवकेंद्री बनवत आहेत.हा प्रवास केवळ प्रशासनाचा नाही, तर समाजाच्या सहभागातून उभ्या राहणाऱ्या आरोग्य चळवळीचा आहे. येणाऱ्या काळात महाराष्ट्र आरोग्य क्षेत्रात देशाला दिशा देणारे अग्रणी राज्य ठरेल, हा विश्वास या कार्यातून दृढ होत आहे.

संपादक
**डॉ.कैलास बाविस्कर**
उपसंचालक,
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे

# समर्पण भावना

## "आरोग्य म्हणजे केवळ उपचार नव्हे, तर समाजाचा सर्वांगीण विकास"

या विचारावर आधारित हा एक वर्षाचा प्रवास महाराष्ट्राला आरोग्यदायी, सुरक्षित आणि संवेदनशील राज्य बनविण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल आहे.



# राज्य आरोग्य धोरण आणि आरोग्य पर्यटन संकल्पना

सार्वजनिक आरोग्य विभागाने महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकट आणि लोकाभिमुख बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. त्याचा एक भाग म्हणून, राज्याने स्वतंत्र 'राज्य आरोग्य धोरण' आणि 'आरोग्य पर्यटन' या संकल्पना रुजवल्या आहेत.

ही धोरणे आणि संकल्पना केवळ रुग्णसेवा सुधारण्यापुरती मर्यादित नाहीत, तर आरोग्य क्षेत्रातील नवकल्पना, तंत्रज्ञानाचा वापर, आणि आरोग्य सेवांची सुलभता यावरही भर देतात.

आरोग्य पर्यटनाच्या माध्यमातून महाराष्ट्रात येणाऱ्या नागरिकांना आणि पर्यटकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळवून देणे, तसेच राज्याचा आरोग्य क्षेत्रातील दर्जा जागतिक पातळीवर उंचावणे, या उद्दिष्टांसाठी हे धोरण दिशा ठरवते.

या संकल्पनांमुळे आरोग्य सेवा अधिक परिणामकारक, सर्वसमावेशक आणि पारदर्शक होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे प्रत्येक नागरिकाला सुलभ, सुरक्षित आणि विश्वासार्ह आरोग्य सुविधा मिळतील.










# रिक्त पदांची भरती

राज्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट, सक्षम आणि लोकाभिमुख बनवण्यासाठी विभागातील रिक्त पदे व प्रतीक्षा यादीवरील पदे तात्काळ भरली जात आहेत.

हे पाऊल केवळ व्यवस्थापन गतिमान करणार नाही, तर सेवा वितरणात सुधारणा आणि प्रत्येक नागरिकाला वेगवान आरोग्य सुविधा मिळण्यास मदत करणार आहे.



अशा त्वरित भरतीमुळे आरोग्य विभाग अधिक सक्षम, प्रतिसादक्षम आणि कार्यक्षम होण्याच्या मार्गावर उभा राहतो.

आरोग्य सेवेतील वर्ग १ वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यास प्राधान्य



# खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम

**राज्यातील खासगी रुग्णालयांमध्ये शासनाच्या नियम व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन होते की नाही याची खातरजमा करण्यासाठी राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.**

पुणे शहरातील खासगी वैद्यकीय व्यावसायिक यांच्याशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी व शासनाकडून असणाऱ्या अपेक्षा याविषयी संवाद साधताना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर






# लॅब ॲक्टद्वारे खासगी लॅबवर नियंत्रण

**राज्यातील सर्व खासगी लॅबमधून नागरिकांना अचूक आणि योग्य चाचण्या मिळाव्यात, यासाठी लॅब ॲक्ट ची स्थापना करण्यात आली आहे.**

या कायद्याद्वारे सर्व खासगी लॅबोरेटरी राज्य शासनाच्या स्वतंत्र नियंत्रणाखाली आणल्या जातील, ज्यामुळे चाचणीची गुणवत्ता, सुरक्षितता आणि विश्वासार्हता सुनिश्चित केली जाईल.

आरोग्य मंत्री यांच्या संकल्पनेनुसार, ही पायरी नागरिकांचे हित, आरोग्य सेवेत पारदर्शकता आणि परिणामकारकता वाढवण्यास महत्त्वाची ठरेल.

राज्यातील आरोग्य व्यवस्थेतील विश्वासार्हता, गुणवत्ता आणि नागरिकाभिमुखता अधिक बळकट होईल.

# ब्लड बँकेवर नियंत्रणासाठी टास्क फोर्स

**राज्यातील रक्तसेवा व्यवस्थेची पारदर्शकता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी राज्य रक्त संक्रमण परिषद अंतर्गत विशेष टास्क फोर्स राबविण्यात आले आहे.**





- हे टास्क फोर्स खासगी आणि शासकीय ब्लड बँक यांच्यावर नियंत्रण ठेवण्यास, नियमांचे पालन सुनिश्चित करण्यास आणि रक्तपुरवठा सुरक्षित करण्यास कार्यरत आहे.

- आरोग्य मंत्री यांच्या संकल्पनेनुसार, रक्तसेवेतील गुणवत्ता, विश्वसनीयता आणि रुग्णांचे हित ही प्राथमिकता ठेवली गेली आहे.

- राज्यातील रक्तसेवा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख बनते, तसेच रक्तापासून होत असलेले संभाव्य धोके कमी होतात.

# राज्यस्तरीय कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम

**कर्करोगाविषयी** जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे, वेळेवर तपासणी करणे, अचूक निदान सुनिश्चित करणे आणि उपचाराची सुविधा पोहोचवणे या उद्देशाने **राज्यस्तरीय कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम** राबविण्यात आली आहे.

या मोहिमेअंतर्गत मोबाईल व्हॅन्सच्या माध्यमातून ग्रामीण, दुर्गम भागांमध्ये देखील सुविधा पोहोचवली जाते, ज्यामुळे प्रत्येक नागरिकाला **कर्करोगाविरुद्ध लवकर तपासणी आणि उपचार मिळण्याची संधी उपलब्ध होते.**

मोहिमेमुळे केवळ **कर्करोगावरील जनजागृती वाढत नाही, तर आरोग्यसेवेची गुणवत्ता सुधारली जाते**, लोकांचा विश्वास वाढतो आणि रोगप्रसार रोखण्यात मदत होते.

यामुळे राज्यातील **आरोग्य सेवा अधिक समावेशक, प्रभावी, परिणामकारक आणि नागरिकाभिमुख बनते.**







**ॲनिमिया**
तपासणी – ५८ लाख ७४ हजार
निदान – ७ लाख ७ हजार

**उच्च रक्तदाब**
तपासणी – १ कोटी ४९ लाख
निदान – ११ लाख २१ हजार

**स्तन कर्करोग**
तपासणी – ८५ लाख ९९ हजार
निदान – ४७१




**मधुमेह**
तपासणी – १ कोटी ३९ लाख
निदान – ५ लाख ६० हजार

**गर्भाशयमुख कर्करोग**
तपासणी – ५६ लाख ४९ हजार
निदान – २४३

# पीसीपीएनडीटी कायद्याची कठोर अंमलबजावणी

**स्त्री भ्रूण हत्येवर** नियंत्रण ठेवणे आणि लिंग गुणोत्तरातील असंतुलन कमी करणे हाच या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

यासाठी गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा (पीसीपीएनडीटी) प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

या कठोर अंमलबजावणीमुळे गर्भलिंग तपासण्या आणि अनधिकृत लिंगनिर्णयावर प्रतिबंध घालण्यात येतो, ज्यामुळे समाजात लिंग संतुलन सुधारण्यास मदत होते. हे पाऊल केवळ कायद्याचे पालन सुनिश्चित करत नाही, तर स्त्रियांचे हक्क आणि आरोग्य संरक्षित करण्यासाठीही महत्त्वाचे आहे. यामुळे राज्यातील आरोग्य व सामाजिक न्याय अधिक प्रभावी, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख बनतो.









# रुग्णालयांना अचानक भेटी

राज्यभरातील **रुग्णालयांतील सोयी-सुविधा** आणि **सेवांची गुणवत्ता सुधारण्यासाठी**, विभागातर्फे महिन्यातून किमान दोन वेळा रुग्णालयांना अचानक भेटी देण्यात येतात.

या भेटींच्या माध्यमातून रुग्णसेवेतील त्रुटी, प्रशासकीय अडचणी आणि व्यवस्थापनातील कमतरता ओळखून तत्काळ सुधारणा केली जाते. यामुळे रुग्णालयातील सेवा अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख बनतात. शासकीय अधिकाऱ्यांची ही प्रत्यक्ष उपस्थिती रुग्ण आणि कुटुंबांसाठी विश्वास वाढविण्याचे काम करते.



# अत्यावश्यक व गरजेच्या औषधांचा नियमित पुरवठा

## राज्यातील सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये अत्यावश्यक आणि गरजेच्या औषधांचा दर्जेदार पुरवठा सुनिश्चित केला जात आहे.

रुग्णांना वेळेवर आणि सुरक्षित औषधे मिळतात, जे उपचाराच्या परिणामकारकतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

संपूर्ण पुरवठा व्यवस्थापन पारदर्शक, सुटसुटीत आणि परिणामकारक पद्धतीने राबविला जात असून,यामुळे रुग्णालयातील औषधांच्या तुटवड्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर होतात आणि सेवेत सुधारणा होते.

अशा नियमित पुरवठ्यामुळे राज्यातील आरोग्यसेवा विश्वासार्ह, कार्यक्षम आणि नागरिकाभिमुख बनण्यास मदत होते.





# औषधे व उपकरणे मानक कार्यप्रणाली (एसओपी)

## राज्यातील सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये औषधे व वैद्यकीय उपकरणांसाठी मानक कार्यप्रणाली (एसओपी) राबविण्यात येत आहे.

ही कार्यप्रणाली केवळ औषधांचा आणि उपकरणांचा सुरक्षित, योग्य आणि नियमित वापर सुनिश्चित करत नाही, तर रुग्णालयातील सेवा गुणवत्ता सुधारण्यास, प्रशासन सुलभ करण्यास आणि रुग्णांना विश्वासार्ह सुविधा देण्यासही मदत करते.

---

एसओपीच्या माध्यमातून संपूर्ण पुरवठा व्यवस्थापन पारदर्शक, परिणामकारक आणि कार्यक्षम बनवले जाते, ज्यामुळे राज्यातील आरोग्यसेवा सशक्त, नागरिकाभिमुख आणि आधुनिक तंत्रज्ञानास अनुकूल बनते.





# ५० टक्के बांधकाम पूर्ण झाल्यावर पद निर्मिती

राज्यातील सर्व सरकारी रुग्णालयांच्या बांधकाम प्रकल्पांची गुणवत्ता आणि वेळेवर पूर्णता सुनिश्चित करण्यासाठी, रुग्णालयातील पदांची निर्मिती बांधकाम ५० टक्के पूर्ण झाल्यानंतर केली जाणार आहे.

या योजनेमुळे रुग्णालयांची व्यवस्थापन क्षमता आणि सेवा कार्यक्षमता सुधारली जाईल. बांधकामाच्या प्रगतीनुसार पदनिर्मिती केल्यामुळे प्रशासन अधिक सुसंगत, पारदर्शक आणि परिणामकारक बनते.

यामुळे राज्यातील आरोग्यसेवा सशक्त, नागरिकाभिमुख आणि कार्यक्षम बनण्यास मोठा हातभार लागेल, तसेच रुग्णालयातील व्यवस्थापनातील अडचणी वेळेत ओळखून सुधारणा करणे शक्य होईल.



# मानसिक रुग्णालय

राज्यातील मनोरुग्णालयांमध्ये सेवा सुधारणा आणि आधुनिक सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत.निम्हांसच्या धर्तीवर, या रुग्णालयांमध्ये व्यवस्थापन सुधारणा, वैद्यकीय सुविधा, थेरपी आणि पुनर्वसन सेवा विकसित केल्या जातील.

ही योजना केवळ मानसिक आरोग्याच्या सेवेत सुधारणा करणार नाही, तर रुग्णांचे मनोबल वाढवणे, कौटुंबिक आधार सुनिश्चित करणे आणि समाजातील मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढवणे यावरही भर देईल.

यामुळे राज्यातील मनोरुग्णालये अधिक सशक्त, परिणामकारक, आधुनिक आणि नागरिकाभिमुख बनतील, जे प्रत्येक रुग्णासाठी विश्वासार्ह आणि पोषक वातावरण उपलब्ध करेल.







# महानगरपालिकांच्या रुग्णालयांमध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा समावेश

बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या रुग्णालयांमध्ये आता **महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा समावेश** करण्यात आला आहे.

या योजनेमुळे नागरिकांना मोफत, गुणवत्तापूर्ण आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध होईल. योजनेच्या अंमलबजावणीत सर्व महानगरपालिकांच्या रुग्णालयांमध्ये समन्वय, पारदर्शकता आणि कार्यक्षमता सुनिश्चित केली जाईल, ज्यामुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळतील आणि आरोग्य सेवेत विश्वासार्हता व सुरक्षितता वाढेल.

ही योजना राज्याच्या आरोग्य धोरणातील एक महत्त्वपूर्ण पाऊल असून, प्रत्येक नागरिकासाठी आरोग्यसेवेत सुधारणा आणि समावेश सुनिश्चित करते.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

MJPJAY



# आरोग्य दिनी सन्मान आणि सत्कार

**राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उत्कृष्ट सेवा देणाऱ्या वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि जास्तीत जास्त सामान्य प्रसूती करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा दि. ७ एप्रिल २०२५ रोजी आरोग्य दिनी सत्कार करण्यात आला.**

**हा सत्कार त्यांच्या कठोर मेहनतीचा आदर दर्शवतो, तसेच रुग्णसेवेत निष्ठा, जबाबदारी आणि उत्कृष्टतेस प्रोत्साहन देण्याचे काम करतो.**

**अशा सन्मानामुळे कर्मचारी मनोबल वाढवून, सेवेत नवउर्जा आणि प्रेरणा घेऊन रुग्णांसाठी अधिक कार्यक्षम आणि नागरिकाभिमुख सेवा देऊ शकतात.**









**हा सत्कार त्यांच्या कठोर मेहनतीचा आदर दर्शवतो, तसेच रुग्णसेवेत निष्ठा, जबाबदारी आणि उत्कृष्टतेस प्रोत्साहन देण्याचे काम करतो**

राज्याच्या आरोग्य व्यवस्थेत या प्रेरणादायी प्रयत्नांनी सुधारणा आणि विश्वासार्हता वाढते आणि प्रत्येक आरोग्यसेवकाला आपल्या कामावर अभिमान आणि उत्तरदायित्वाची भावना निर्माण होते

# दिव्यांग बांधवांसाठी दिव्यांग प्रमाणपत्र सेवा

राज्यातील ५० बेडपर्यंतच्या सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये दिव्यांग नागरिकांना दिव्यांग प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू करण्यात आली आहे.





या उपक्रमाचा उद्देश दिव्यांग नागरिकांना सोपी, जलद आणि सुलभ सेवा उपलब्ध करून देणे हा आहे, ज्यामुळे ते आपल्या अधिकारांचा लाभ घेऊ शकतील. दिव्यांग प्रमाणपत्राच्या उपलब्धतेमुळे सहाय्यक योजनांचा लाभ, शासकीय सुविधा आणि सामाजिक समावेश सहज प्राप्त करता येईल.



हे पाऊल राज्यातील दिव्यांग बांधवांसाठी सशक्त, नागरिकाभिमुख आणि विश्वासार्ह सेवा सुनिश्चित करते, तसेच त्यांच्या जीवनातील स्वावलंबन आणि सामाजिक समावेश वाढवते.







# e-Sushrut (HMIS System) संकेतस्थळाचे विस्तारीकरण


**राज्यातील आरोग्य व्यवस्थेतील डेटा व्यवस्थापन, रुग्णसेवा नोंदी आणि प्रशासनिक प्रक्रिया अधिक परिणामकारक बनवण्यासाठी e-Sushrut (HMIS System) संकेतस्थळाचे विस्तारीकरण करण्यात येत आहे.**




या विस्ताराद्वारे संपूर्ण आरोग्य विभागातील माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध होईल, ज्यामुळे तत्काळ निर्णय घेणे, सेवेत सुधारणा करणे आणि पारदर्शकता सुनिश्चित करणे शक्य होईल.

e-Sushrut च्या माध्यमातून रुग्णांची माहिती सुरक्षित, व्यवस्थित आणि सहज उपलब्ध होईल, ज्यामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक कार्यक्षम, परिणामकारक आणि नागरिकाभिमुख बनते.

हा उपक्रम तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून आरोग्य व्यवस्थेतील गुणवत्ता सुधारण्याचा महत्त्वपूर्ण भाग आहे.



# महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी प्रणालीचे ऑनलाईन प्रमाणपत्र वितरण (Bombay Nursing Home Act)

**राज्यातील सर्व शासकीय आणि खासगी शुश्रुषागृहांसाठी नोंदणी प्रक्रिया डिजिटल करून ऑनलाईन प्रमाणपत्र वितरण सुरू करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे Bombay Nursing Home Act अंतर्गत नोंदणीकृत शुश्रुषागृहांना प्रमाणपत्र सुलभ आणि जलद पद्धतीने दिले जाते.**



## फायदे:

- **सुलभता आणि वेग:** रुग्णालयांना आणि प्रशासनाला प्रमाणपत्र मिळवण्यासाठी वेळ वाया जात नाही. **पारदर्शकता:** डिजिटल नोंदणीमुळे प्रक्रिया पारदर्शक आणि गडबड कमी होते.
- **विश्वासार्हता:** शुश्रुषागृहांची नोंदणी योग्य आणि अधिकृत प्रमाणपत्रासह होते, ज्यामुळे नागरिकांचा विश्वास वाढतो.
- **कार्यक्षमता:** प्रशासन आणि निरीक्षण यंत्रणा अधिक कार्यक्षम बनते.
- **सुरक्षितता:** कागदी प्रमाणपत्राच्या जागी डिजिटल माध्यमामुळे सुरक्षितता सुनिश्चित होते.

**या डिजिटल उपक्रमामुळे राज्यातील आरोग्य सेवा अधिक आधुनिक, पारदर्शक, नागरिकाभिमुख आणि परिणामकारक बनते, तसेच शुश्रुषागृह व्यवस्थापनात सुलभता आणि कार्यक्षमता आणली जाते.**

# डायलिसीस युनिट्सची सुरुवात

## राज्यातील ५ जिल्ह्यांमध्ये ६ आरोग्य संस्थांमध्ये डायलिसीस युनिट्स सुरू करण्यात आल्या आहेत, जे रुग्णाभिमुख आणि सेवा-केंद्रित आहेत.

या युनिट्सच्या माध्यमातून किडनी रोगग्रस्त रुग्णांना त्यांच्या जिल्ह्यातच दर्जेदार **डायलिसीस सेवा** उपलब्ध होणार आहे, जे प्रवासाचा त्रास आणि अतिरिक्त खर्च वाचवते. युनिट्समध्ये आधुनिक उपकरणे, प्रशिक्षित कर्मचारी आणि सुरक्षित उपचार उपलब्ध आहेत, ज्यामुळे रुग्णांना वेळेत आणि दर्जेदार सेवा मिळते.








# गर्भाशयमुख कर्करोग जनजागृती अभियान (९ ते १४ वर्षे वयोगट)

**राज्यातील मुलींच्या आरोग्यसुरक्षेसाठी ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी गर्भाशयमुख कर्करोगाविषयी जनजागृती अभियान राबविण्यात आले आहे.**

या मोहिमेचा उद्देश लहान वयोगटातच मुलींमध्ये योग्य आरोग्य माहिती पोहोचवणे, कर्करोगाची लक्षणे ओळखणे आणि वेळेवर तपासणीस प्रोत्साहित करणे हा आहे.

अभियानाद्वारे मुलींना रक्तस्राव, वेदना, लक्षणे आणि प्रतिबंधक उपाय याविषयी योग्य माहिती दिली जाते, ज्यामुळे भविष्यातील आरोग्य सुरक्षेसाठी पायाभरणी केली जाते.

हा उपक्रम शालेय आरोग्य कार्यक्रमांमध्ये समाविष्ट करून, समाजात जागरूकता वाढवणे, मुलींचे आरोग्य संरक्षित करणे आणि आरोग्यसेवा अधिक प्रभावी करणे हाही उद्देश साधतो.

**यामुळे राज्यातील कर्करोग प्रतिबंधक कार्यक्रम प्रभावी, नागरिकाभिमुख आणि परिणामकारक ठरतो.**







# महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालयांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा शुभारंभ

**राज्यातील महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीच्या रुग्णालयांमध्ये आता महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा शुभारंभ करण्यात आला असून, ही योजना सर्वांसाठी खुली करण्यात आली आहे.**

**फायदे:**

- **सर्वांसाठी उपलब्धता:** योजना राज्यातील प्रत्येक नागरिकाला सुलभ आणि मोफत आरोग्य सेवा प्रदान करते.
- **उच्च दर्जाची सेवा:** रुग्णालयांमध्ये प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी, आधुनिक उपकरणे आणि उपचार सुविधा उपलब्ध आहेत.
- **सुलभता आणि विश्वासार्हता:** नागरिकांना आरोग्य सेवा मिळवण्यासाठी अडचणींचा ताण कमी होतो आणि सेवेत पारदर्शकता वाढते.
- **समावेशकता:** योजना कामगारांपासून ते सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांसाठी लाभदायक आहे, ज्यामुळे आरोग्य सुविधांचा समावेश वाढतो.
- **सशक्त आरोग्य व्यवस्था:** योजनेमुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेतील विश्वासार्हता, कार्यक्षमता आणि नागरिकाभिमुख सेवा अधिक बळकट होते.





# आरोग्य सुविधांचे लोकार्पण

**राज्यातील कर्करोग प्रतिबंधक आणि उपचारक्षम आरोग्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी विविध आधुनिक सुविधा सुरू करण्यात आल्या आहेत.**

**यामध्ये समाविष्ट आहेत**

- **८** कर्करोग मोबाईल व्हॅन
- **२** सीटी स्कॅन मशीन
- **७** ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट रुग्णवाहिका
- **८०** डिजिटल हॅंड-हेल्ड एक्स-रे मशिन
- **३८४** १०२ रुग्णवाहिका
- **६** डे केअर किमोथेरपी सेंटर

या आधुनिक सुविधांमुळे रुग्णांना जलद, सुरक्षित आणि दर्जेदार सेवा मिळणे सुनिश्चित होते. मोबाईल व्हॅन्स आणि अत्याधुनिक रुग्णवाहिकांद्वारे ग्रामीण आणि दुर्गम भागातील रुग्णांपर्यंत तातडीने सेवा पोहोचवणे शक्य होते.

सीटी स्कॅन, डिजिटल एक्स-रे आणि डे केअर किमोथेरपी सेंटरमुळे कर्करोग निदान आणि उपचाराची गुणवत्ता सुधारते, तर रुग्णांना सुलभ आणि परिणामकारक सेवा मिळते.

हा उपक्रम राज्याच्या आरोग्य व्यवस्थेतील सशक्तीकरण, आधुनिकता आणि नागरिकाभिमुखतेचा मार्गदर्शक ठरतो, जे प्रत्येक रुग्णासाठी विश्वासार्ह आणि सुरक्षित सेवा सुनिश्चित करतो.







# ‘नो शॉर्टेज, नो वेस्टेज’ धोरण

**राज्यातील प्रत्येक गरजू रुग्णाला वेळेवर रक्त मिळावे, याची खात्री करण्यासाठी आणि रक्ताचा तुटवडा होऊ नये तसेच अतिरिक्त रक्त वाया जाऊ नये, असे उद्दिष्ट ठेवून ‘नो शॉर्टेज, नो वेस्टेज’ धोरण राबविण्यात आले आहे.**

या धोरणाद्वारे रक्तपुरवठा वेळेत आणि व्यवस्थित होईल. वाया गेलेल्या रक्ताचे प्रमाण कमी होईल, ज्यामुळे संसाधनांचा कार्यक्षम वापर सुनिश्चित होईल. रुग्णांना आपत्कालीन रक्तसेवा जलद आणि सुरक्षित मिळेल. राज्यातील रक्तबँक व्यवस्थापन अधिक पारदर्शक, नियोजित आणि परिणामकारक बनेल.



हा उपक्रम राज्यातील आरोग्य व्यवस्थेत विश्वासार्हता, कार्यक्षमता आणि नागरिकाभिमुख सेवा सुनिश्चित करण्याचे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरते, ज्यामुळे प्रत्येक रुग्णासाठी आवश्यक आणि जीवरक्षक सेवा उपलब्ध होते.

# मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यात सुधारणा आणि अंगदान जनजागृती उपक्रम

**राज्यातील मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यात सुधारणा करण्यासाठी आरोग्य विभागाने दूरदृष्टीचा पुढाकार घेतला आहे.**

अवयवदानाविषयी व्यापक जनजागृती आणि नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी **'अंगदान-जीवन संजीवनी अभियान'** राबविण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत, ३ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत **'अवयवदान जनजागृती पंधरवडा'** आयोजित केला गेला आहे.

स्वातंत्र्यदिनी राज्यातील अवयवदाते आणि त्यांच्या नातेवाईकांचा सन्मान करण्यात आला आहे, ज्यामुळे **अवयवदानाच्या मूल्याची आणि जीवनदानाची** महती समाजासमोर प्रकट झाली.











# आषाढी वारी विशेष आरोग्य उपक्रम 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची'




**आषाढी वारीच्या निमित्ताने, राज्यातील आरोग्य विभागाने देहू-आळंदी ते पंढरपूर मार्गावर विशेष आरोग्य उपक्रम राबविला.**

**या उपक्रमाद्वारे एकूण ९,२३,५०९ वारकऱ्यांनी मोफत आरोग्य तपासणी आणि आवश्यक औषधोपचाराचा लाभ घेतला.**

**'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या संकल्पनेअंतर्गत, आरोग्य विभागाने वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी, तपासणी आणि तातडीची सेवा उपलब्ध करून दिली.**

- मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचार उपलब्ध झाले.
- वारकऱ्यांना आरोग्याची सुरक्षितता आणि सुविधा मिळाली.
- राज्यातील आरोग्य सेवा कार्यक्षमता, नागरिकाभिमुखता आणि जागरूकता वाढली.

**४,३७६**
मनुष्यबळ (अधिकारी व कर्मचारी)

**२०३**
'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' तात्पुरते आरोग्य केंद्र

**२९०**
फिरते दुचाकी आरोग्यदूत (प्रथमोपचार पेटी सहित)

**३३१**
१०२ व १०८ रुग्णवाहिका (२४x७ सेवा)

**१५**
स्त्रीरोग तज्ज्ञ (महिला रुग्णांसाठी)

**३७**
हिरकणी कक्ष

**३५००**
दिंडी प्रमुखांना औषधी कीट वितरण

**४६**
अतिदक्षता (ICU) सुविधा असलेली केंद्र (५ बेड क्षमता)

# आषाढी वारी काळातील पुरविण्यात आलेल्या आरोग्य सेवांचा आढावा

## आपत्कालीन व त्वरित सेवा



१०८ व १०२ रुग्णवाहिकेद्वारे सेवा – १,१४४ लाभार्थी

उपजिल्हा रुग्णालय व ट्रॉमा ICU सेवा – ८६,९२२ लाभार्थी

## पालखी सोहळ्यातील सेवा



संत ज्ञानेश्वर महाराज पालखी – ३,५६,३८९ लाभार्थी

संत तुकाराम महाराज पालखी – २,२९,१८३ लाभार्थी

संत सोपानकाका महाराज पालखी – १९,३६४ लाभार्थी

मानाच्या इतर पालख्या व दिंडी सेवा – ५८,३८६ लाभार्थी

## विशेष शिबिरे आणि स्थानिक उपक्रम

पंढरपूर – संस्था / एचबीटी शिबिरे – ६२,६७० लाभार्थी

तीन रस्ता शिबिर – ८३,५९५ लाभार्थी

## बाह्यरुग्ण आणि आंतररुग्ण सेवा

बाह्यरुग्ण सेवा (OPD) – ९,१८,४१९ लाभार्थी

आंतररुग्ण सेवा (IPD) – ५,०१० लाभार्थी

**एकूण मिळून : ९,२३,५९१ लाभार्थ्यांना आरोग्य सेवेचा लाभ मिळाला.**









# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान
# व्यापक आरोग्य तपासणी

राज्यातील **'स्वस्थ नारी, सशक्त परिवार'** अभियान अंतर्गत **१ कोटीपेक्षा** अधिक नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे, ज्यामध्ये **७५ लाख ८७ हजाराहून** अधिक महिलांची तपासणी समाविष्ट आहे.

## अभियानाद्वारे:

- महिलांना संपूर्ण आरोग्य तपासणी, रोग प्रतिबंधक उपाय आणि तातडीची वैद्यकीय मदत मिळाली. राज्यातील महिला आरोग्य आणि सशक्त कुटुंबासाठी आवश्यक संसाधने प्रभावी पद्धतीने वापरली गेली.
- आरोग्य जागरूकता वाढवणे आणि महिलांच्या आरोग्य सुधारण्यात समाजाचा सहभाग सुनिश्चित झाला.
- हा उपक्रम राज्याच्या आरोग्य व्यवस्थेत महिला कल्याण आणि कुटुंब सशक्तीकरणाची दिशादर्शक योजना ठरतो, ज्यामुळे प्रत्येक नागरिकाला आरोग्यसेवा सोपी, सुरक्षित आणि प्रभावी मिळते.





उपक्रमाचा उद्देश महिला आरोग्य, कुटुंबाचे कल्याण आणि समाजातील सशक्तीकरण सुनिश्चित करणे आहे.









# कुष्ठरोग 'नोटिफाएबल डिसीज' म्हणून घोषित

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम

**राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने कुष्ठरोगाला 'नोटिफाएबल डिसीज' म्हणून अधिकृतपणे घोषित केले आहे**

- कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग विभाग तसेच स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे करणे बंधनकारक ठरले आहे.
- ही नोंदणी सर्व डॉक्टर आणि आरोग्य संस्थांसाठी अनिवार्य आहे, ज्यामुळे रुग्णांना वेळेत उपचार आणि सतत देखभाल मिळते.
- कुष्ठरोग प्रतिबंधक कार्यक्रम अधिक पारदर्शक, नियोजित आणि परिणामकारक बनतो.
- या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत रुग्णाभिमुख सेवा, संसाधनांचा योग्य वापर आणि सामाजिक सुरक्षितता सुनिश्चित होते.
- हा निर्णय कुष्ठरोग प्रतिबंधक धोरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा असून, रुग्णांचे कल्याण आणि समाजातील रोग प्रतिबंधक उपाययोजना प्रभावी करण्याचा उद्देश साधतो.


महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ



# अंगीकृत रुग्णालयांसाठी १०८ रुग्णवाहिका आणि जलद क्लेम प्रक्रिया

**राज्यातील एकत्रित आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत, अंगीकृत रुग्णालयांच्या सेवेत १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.**



**या रुग्णवाहिकांच्या माध्यमातून:**

- आपत्कालीन रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल केले जाईल
- रुग्णांवर उपचार झाल्यानंतर दावे (क्लेम) मागणीबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यास, त्याच महिन्यात दाव्याची रक्कम अदा केली जाईल, ज्यामुळे रुग्णांना आर्थिक ताण न येता उपचाराचे फायदे मिळतील.
- आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा जलद, सुरक्षित आणि विश्वसनीय होईल.
- आरोग्य संस्थांचे सेवा कार्यक्षमता आणि नागरिकाभिमुखता वाढेल.
- राज्यातील आरोग्य धोरण अधिक पारदर्शक, परिणामकारक आणि आधुनिक बनेल.

**हा उपक्रम राज्याच्या आरोग्य व्यवस्थेत विश्वासार्हता, तातडीची सेवा आणि रुग्णाभिमुख दृष्टिकोन सुनिश्चित करण्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरतो,ज्यामुळे प्रत्येक रुग्णाला सुलभ, सुरक्षित आणि परिणामकारक आरोग्य सेवा मिळते.**







# यांत्रिक वस्त्र धुलाई सेवेद्वारे शासकीय रुग्णालयांमध्ये स्वच्छता व सुरक्षितता वाढवणे

**राज्यातील ५९३ शासकीय रुग्णालयांमध्ये स्वच्छता, सुरक्षितता आणि निर्जंतुक सेवा अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभागाने एक अभिनव यांत्रिक वस्त्र धुलाई सेवा प्रकल्प कार्यान्वित केला आहे.**

## या प्रकल्पाद्वारे:

- रुग्णालयातील बिछान्याचे कपडे, वॉर्डची पडदे आणि रुग्णालयीन वस्त्रे यांत्रिक पद्धतीने धुतली जातील, ज्यामुळे निर्जंतुकता आणि स्वच्छता सुनिश्चित होते.
- हाताळणीवरील मानवी त्रुटी कमी होतात, तसेच कर्मचारी आणि रुग्णांसाठी सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण तयार होते.
- रुग्णालयातील सेवा कार्यक्षमता वाढते आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर सुनिश्चित होतो.


आजचा रंग कोणता? रुग्णालयात वापरलेली बेडशीट लगेच समजणार!

**हा प्रकल्प राज्यातील आरोग्य व्यवस्थेत नाविन्यपूर्ण उपाय, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग आणि नागरिकाभिमुख सेवा सुनिश्चित करतो.**



# महात्मा फुले जनआरोग्य योजनेत १० लाख रुपयांपर्यंत उपचाराची हमी!

**गंभीर आजारांसाठी आता मिळणार तब्बल १० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची हमी!**

**महाराष्ट्र सरकारने सर्वसामान्यांचा आरोग्याचा हक्क अधिक बळकट करत, महात्मा फुले जनआरोग्य योजनेत ऐतिहासिक वाढ केली आहे.**

**गंभीर व खर्चिक आजारांसाठी आता १० लाख रुपयांपर्यंतचे उपचार पूर्णतः मोफत**

**गरजूंना त्वरित आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळण्यास मोठा दिलासा**




**आर्थिक अडचणीमुळे** उपचार थांबणार नाहीत

**रुग्ण व कुटुंबाची आर्थिक काळजी सरकार घेईल उपचार मात्र सर्वोत्तम होतील**

# महात्मा फुले जन आरोग्य' योजनेत उपचारांची संख्या दुप्पट

- उपचारांची संख्या १,३५६ वरून थेट २,३९९ पर्यंत वाढवली
- विशेषज्ञ सेवांची व्याप्ती ३४ वरून ३८ विभागांपर्यंत वाढवली
- हृदय, मूत्रपिंड, कर्करोग, अस्थिरोग, प्रसूती, बालरोग, मानसिक आरोग्य यांसह अनेक गंभीर आजारांचा समावेश
- जिल्हा व उपजिल्हा रुग्णालयांनाही आता अधिक उपचार सुविधा







**"सर्वसामान्य जनतेला अधिकाधिक दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हेच आमचे प्राधान्य!"**

# आयुष्मान कार्ड निर्मिती व वितरण करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात मोठी वाढ!

**आरोग्य सेवेच्या गतीला नवे बळ — कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव!**

महाराष्ट्र शासनाने महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत आयुष्मान कार्ड तयार व वितरित करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यास मंजुरी दिली आहे.




**नवीन मानधन दर :**

- प्रत्येक यशस्वी KYC साठी — ₹५ वरून ₹२०
- कार्ड वितरणासाठी — ₹३ वरून ₹१०
- एकूण मानधन : ₹३० प्रति कार्ड

**राज्यातील प्रगती :**

- ३.४४ कोटी आयुष्मान को-ब्रँडेड कार्डे तयार
- उर्वरित ९.३० कोटी कार्डे वेगाने पूर्ण करण्याचे लक्ष्य

**या निर्णयाचे फायदे :**

- सेवेचा वेग वाढणार
- नागरिकांपर्यंत कार्ड वितरणाची पोहोच वाढणार
- कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह आणि प्रेरणा निर्माण होणार

**"आरोग्य हमी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक कर्मचाऱ्याचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान व प्रेरणा वाढवणे — हेच मानधनवाढीचे मुख्य उद्दिष्ट आहे."**

# एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे...

थॅलेसेमियाग्रस्त बालकाचा जन्म रोखणे व असलेल्या थॅलेसेमियाग्रस्त बालकांचे आयुष्यमान वाढविण्यासाठी ८ मे २०२५ रोजी जागतिक थॅलेसेमिया दिवसाचे औचित्य साधून 'एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे' या अभियानाचा शुभारंभ. शासनामार्फत मिळत असलेल्या सर्व सोई सुविधा व योजनांचा लाभ थॅलेसेमिया, हिमोफिलिया, सिकलसेल रुग्णांना होणार. तालुका स्तरावर थॅलेसेमिया मेजर बालकांना रक्तसंक्रमण सुविधा उपलब्ध. खासगी रक्तपेढी व शासकीय रक्तसंक्रमण अधिकारी व पालकांसोबत सहकार्य.





# नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर या कालावधीत राज्यात 'नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान' राबविण्यात आले. या अभियानांतर्गत नागरिकांची नेत्र तपासणी, उपचार व मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. नागरिकांमध्ये नेत्र आरोग्यविषयक जागरुकता वाढवून त्यांना मोफत नेत्र सेवा उपलब्ध करून देण्यात आली.




# राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी ऐतिहासिक दिलासा!

## दीर्घकाळ प्रलंबित मागणी पूर्ण
## नियमित पदांवर समायोजनास दुरुस्तीसह सरकारची मंजुरी

**मुख्य बाबी :**

- १४ मार्च २०२४ रोजी दहा वर्ष सेवा पूर्ण केलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) कंत्राटी कर्मचाऱ्यांना समकक्ष नियमित पदावर समायोजन करण्यास शासनाची मान्यता.
- यापूर्वीच्या निर्णयातील तांत्रिक अडचणी दूर करून दुरुस्तीस मंजुरी देण्यात आली.
- समायोजनासाठी केवळ सार्वजनिक आरोग्य विभागातीलच नव्हे, तरग्रामविकास विभागामार्फत भरण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेतील रिक्त पदांचाही समावेश — त्यामुळे समायोजनाच्या संधी अधिक व्यापक.
- अनेक वर्षे कंत्राटी पद्धतीत सेवाभावाने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना यामुळे नोकरीत स्थैर्य, सुरक्षितता आणि न्याय मिळणार.
- ग्रामीण आणि शहरी आरोग्य व्यवस्थेत कार्यरत मनुष्यबळ अधिक सक्षम, स्थिर आणि प्रेरित होणार.
- "सेवाभावाला न्याय — NHM कुटुंबासाठी सरकारचा मोठा निर्णय!"

# औषधी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा तसेच RT-PCR रेण्विय चाचणी सुविधा प्रयोगशाळांची निर्मिती

**राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांना पुरवठा होणाऱ्या औषधांची पुरवठा पाश्चात गुणवत्ता तपासणी करण्यासाठी विभागाच्या अधिपत्याखलील शासकीय औषधी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा तसेच RT-PCR रेण्विय चाचणी सुविधा प्रयोगशाळांची निर्मिती.**

राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेच्या अधिनस्त असलेल्या प्रादेशिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथे औषधांची पुरवठा पाश्चात गुणवत्ता तपासणी करण्यासाठी विभागीय औषधी गुणवत्ता तपासणी सुविधा निर्माण करण्यास तसेच राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे RT-PCR रेण्विय चाचणी सुविधा निर्माण करण्यास तत्वतः मान्यता.

**यामुळे औषधांची गुणवत्ता वाढून रुग्णांना चांगली आरोग सेवा मिळेल.**

# सिकलसेलमुक्त महाराष्ट्रासाठी 'अरुणोदय' विशेष तपासणी मोहीम

**दि. १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राज्यातील आदिवासीबहुल २१ जिल्ह्यांतील नागरिकांची सिकलसेल तपासणी करण्यासाठी 'अरुणोदय' ही विशेष मोहीम**

**सिकलसेल या अनुवांशिक आजाराचे लवकर निदान, वेळेवर उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश**

**या विशेष मोहिमेत ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, पालघर, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, धुळे, जळगाव, बुलढाणा, नांदेड, वाशिम, अकोला, छत्रपती संभाजीनगर, रायगड व हिंगोली या आदिवासीबहुल २१ जिल्ह्यांचा समावेश**










# पॅलिएटिव्ह केअर विशेष मोहीम

- दि. ९ फेब्रुवारीपासून राज्यात पॅलिएटिव्ह केअर विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.
- गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना घरच्या घरी दर्जेदार सेवा, वेदना नियंत्रण, समुपदेशन व आवश्यक वैद्यकीय सहाय्य उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश.
- मोहिमेच्या तयारीसाठी प्रत्येक जिल्ह्यात पॅलिएटिव्ह केअर सेवा प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रशिक्षण व तयारी
- जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या स्तरावर सर्व वैद्यकीय अधिकारी यांचे ऑनलाईन/प्रत्यक्ष प्रशिक्षण व ओरिएंटेशन
- जानेवारी अखेरच्या मासिक सभेत आशा स्वयंसेविका यांचे प्रशिक्षण घेणे (MO PHC/CHO मार्फत).
- ३१ जानेवारीपूर्वी जिल्ह्यात कार्यरत अशासकीय संस्था (NGOs) यांची बैठक घेऊन त्यांचा पॅलिएटिव्ह केअरमध्ये add-on activity म्हणून सहभाग निश्चित करणे.
- ७ फेब्रुवारीपूर्वी घरोघरी सर्वेक्षण करून पॅलिएटिव्ह केअरसाठी पात्र रुग्णांच्या याद्या अंतिम करणे व ९ फेब्रुवारीपासून होम व्हिजिटसाठी मायक्रोप्लॅन तयार करणे.
- ३१ जानेवारीपूर्वी RH/SDH स्तरावर २-३ व जिल्हा रुग्णालय स्तरावर ५-१० बेड राखीव ठेवून त्यांना पॅलिएटिव्ह केअर कक्षाचे स्वरूप देणे.
- ३१ जानेवारीपूर्वी सर्व आवश्यक औषधी (मॉर्फिनसह) उपलब्ध करून घेणे. (जिल्हा शल्यचिकित्सक)
- ३१ जानेवारीपूर्वी उपकेंद्र/आशा स्वयंसेविका स्तरावर "होम केअर किट" तयार करून ठेवणे.
- जिल्हा स्तरावर पॅलिएटिव्ह केअर समिती गठित करून ती कार्यान्वित करणे.
- जिल्हास्तरावर स्वतंत्र पॅलिएटिव्ह केअर कक्ष कार्यान्वित करणे.
- टेलिकन्सल्टेशन हब तयार करणे.
- ३१ जानेवारीपूर्वी मॅप केलेल्या ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टर (Physician, Psychiatrist, Physiotherapist इ.) उपलब्ध राहतील असे निश्चित OPD दिवस ठरविणे.



# हत्तीरोग सार्वत्रिक औषधोपचार मोहीम



- राज्यात दि. १० फेब्रुवारी २३ फेब्रुवारी या कालावधीत हत्तीरोग सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबविण्यात येणार आहे.
- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ठाणे, नंदुरबार, पालघर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये ही मोहीम राबविणार
- मोहिमेच्या यशस्वी नियोजनासाठी राज्य तांत्रिक सल्लागार समितीद्वारे सहा जिल्हा स्तरावर प्रशिक्षण आणि मदत.

# एन.आय.व्ही. 'च्या धर्तीवर राज्यात एम.आय.व्ही. प्रयोगशाळा

## राज्यातील एम.आय.व्ही. प्रयोगशाळा 'एन.आय.व्ही.'च्या धर्तीवर उत्कृष्टतेकडे वाटचाल

महाराष्ट्र शासनाची एम.आय.व्ही. (MIV) प्रयोगशाळा ही राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेच्या (NIV) दर्जाच्या धर्तीवर अधिक सक्षम, अचूक आणि गुणवत्तापूर्ण बनविण्याचा सार्वजनिक आरोग्य विभागाचा ठाम संकल्प आहे. संशोधन, रोगनिदान आणि प्रयोगशाळा व्यवस्थापन या सर्वच स्तरांवर उच्च दर्जा, काटेकोर मानके आणि उत्कृष्ट कार्यपद्धती अवलंबण्याचे धोरण. "राज्यातील एम.आय.व्ही. प्रयोगशाळा रोगनिदान क्षेत्रात आदर्श ठरावी वअचूक आणि वेळेवर निदान देणारी विश्वासार्ह केंद्रे बनावीत,आणि महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला बळकटी देणारे प्रमुख स्तंभ म्हणून उभ्या राहाव्याहेच आपले उद्दिष्ट.





# वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार




- आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे देणे, आरोग्य विषयक उपक्रमांची यशस्वीपणे अंमलबजावणी करणे आणि लोकसहभागातून विविध आरोग्य कार्यक्रम यशस्वी करणे या उद्देशाने आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या **१ स्वयंसेवी संस्था, ३ डॉक्टर, १ पत्रकार, ५ क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना** दरवर्षी आरोग्य रत्न पुरस्कार दिला जातो.
- **प्रत्येकी १ लाख रुपये,** सन्मान चिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून प्रत्येक पुरस्कार वर्गासाठी वेगळे निकष निश्चित करण्यात आले आहेत.
- या पुरस्कारांसाठी गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीतर्फे गुणांकनानुसार सर्वोत्कृष्ट पुरस्कारार्थ्यांची निवड करण्यात येते.
- लवकरच २०२३-२४ आणि २०२४-२५ या वर्षासाठीचे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.



# आशा कौशल्य विकास कार्यक्रम

## सर्व जिल्हानिहाय आशा स्वयंसेविका गुणानुक्रम तक्ता माहे डिसेंबर २०२५

| राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, महाराष्ट्र - पुणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सर्व जिल्हानिहाय आशा स्वयंसेविका गुणानुक्रम तक्ता माहे डिसेंबर २०२५ | | | | | | |
| अ. क्र | परिमंडळ | जिल्हा | तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्र | आशा स्वयंसेविकेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | प्राप्त गुण |
| १ | ठाणे | ठाणे | मुरबाड | म्हसा | श्रीमती वैशाली सावळे, मो.नं. ७८८७६६२१८१ | ३८ |
| २ | ठाणे | रायगड | पेण | गडब | श्रीमती प्रणाली महेन्द्र कदु मु.पो.गडब, उपकेंद्र डोलवी मोबा क्र. ९८६०६०५९३७ | ३८ |
| ३ | ठाणे | पालघर | पालघर | तारापुर | श्रीमती अमुला दिपक राऊत, कुडण, मो.नं. ८८३०८६७५५१ | ३६ |
| ४ | नाशिक | नाशिक | दिंडोरी | तळेगांव दि | श्रीमती आश्विनी राजेंद्र गांगुर्डे, दिंडोरी २ | ३६ |
| ५ | नाशिक | धुळे | धुळे | बोरकुंड | श्रीमती सविता वाईलाल राठोड, मो.नं. ८४५९३९३९१८* | ३१ |
| ६ | नाशिक | नंदुरबार | नंदुरबार | ग्र.शहादा | श्रीमती भावना पिंपळे मु.पो - पानोशी, मो - ८४५९७४८६२८ | ३५ |
| ७ | नाशिक | जळगाव | भडगाव | कजगाव | वंदना ज्ञानेश्वर पाटील | ३२ |
| | नाशिक | अहिल्यानगर | श्रीगोंदा | बेलवंडी | श्रीमती निर्मला अनिल पवार, मु.पो. बेलवंडी, मो. नं. ९९२३५४८६५२ | ४० |
| ९ | पुणे | पुणे | भोर | भोंगवली | नाव - प्रतिभा राजेंद्र साळुंके मु.पो. सावरदरे ता.भोर जि.पुणे. मोबाईल नं - ९८११११५८९५ | ४० |
| १० | पुणे | सातारा | सातारा | चिंचणेर वंदन | श्रीमती सुमंगी मधुकर पाटील | ४० |
| ११ | पुणे | सोलापूर | पंढरपूर | कासेगाव | श्रीमती वैशाली अनिल रणदिवे | ४० |
| १२ | कोल्हापूर | कोल्हापूर | चंदगड | हेरे | श्रीम. प्रिया पुंडलिक पाटील, मुपो जंगमहट्टी, मो.नं. ९५५२८५७५५१ | ४० |
| १३ | कोल्हापूर | सांगली | तासगाव | वायफळे | श्रीमती वनिता अरविंद जमदाडे, गाव जमदाडेवाडी, पीएचसी वायफळे, मोब नंबर ९३०७१०२९६४ | ३६ |
| १४ | कोल्हापूर | सिंधुदुर्ग | वैभववाडी | उंबर्डे | श्रीमती सुस्मिता सुशील कांबळे मु.पो.कोळपे उपकेंद्र, कोळपे सिंधुदुर्ग. नं ७३९८४०१३५७ | ३८ |
| १५ | कोल्हापूर | रत्नागिरी | संगमेश्वर | कोंडिवरे | श्रीमती वनिता दिलीप कदम | ३९ |
| १६ | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | सिल्लोड | उंडणगाव | श्रीमती ज्योती सत्यपाल मराठे,मु.पो हळदा ता.सिल्लोड. जि. छ.संभाजीनगर. | ३८ |
| १७ | छत्रपती संभाजीनगर | जालना | घनसावंगी | पिंपरखेड | श्रीमती महानंदा सुधाकर खंदारे पत्ता:- पिंपरखेड, मोबाईल क्रं ७५०७७७८२३७१ | ४० |
| १८ | छत्रपती संभाजीनगर | परभणी | सेलु | देऊळगाव गात | श्रीमती वर्षा भगवानराव बांडले ७७४४०६०८३१ | ३५ |
| १९ | छत्रपती संभाजीनगर | हिंगोली | वसमत | कुरुंदा | श्रीमती मिना राहूल इंगोले, सुकळी, मो.नं. ८८३०२४९६६५ | ३८ |
| २० | लातूर | लातूर | उदगीर | वाढवणा बोके | श्रीमती अनुसया गंगाधर रेड्डी रा. ईस्मालपूर बोके ता.उदगीर जि. लातूर मो. ९५५२०४९८३१ | ३८ |
| २१ | लातूर | धाराशिव | अप्राप्त | | | |
| २२ | लातूर | बीड | पाटोदा | बहाली | श्रीमती.लता अशोक भवर, गावचे नाव मुगगाव ता.पाटोदा जि. बीड, मो.नं.९०४९४०७३६७ | ३९ |
| | लातूर | नांदेड | अप्राप्त | | | |
| २४ | अकोला | अकोला | बार्शिटाकळी | कान्हेरी सरप | श्रीमती सुलोचना मेहराम पवार, दगडपारवा, मो.नं.८८४००२३८०८, | ३८ |
| २५ | अकोला | वाशिम | मानोरा | कुपटा | श्रीमती प्रमिला उमेश इंगोले चीव कुपटा ( आशा ) | ३८ |
| २६ | अकोला | अमरावती | अमरावती | निंबोली | श्रीमती रत्नकला संजय विधुरकर, मुपो डोरगांव, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती, मो.७३६८८५६८०७ | ३८ |
| २७ | अकोला | यवतमाळ | महागाव | महागाव | श्रीमती सुजाता प्रमेश्वर खाडेरे मो.न ८४१२९६०९४० | ३४ |
| २८ | अकोला | बुलढाणा | जळगाव जामोद | जामोद | श्रीमती लिना संतोष ताडे मु .पो. वाडी खु ता .जळगाव जामोद जि. बुलढाणा मो.न ९७६४५०६९४६ | ३२ |
| २९ | नागपूर | नागपुर | कामठी | गुमथळा | श्रीमती आम्रपाली पाटील मो.नं. ९७२२०७१२२२ पत्ता. नवीन नगर | ३९ |
| ३० | नागपूर | वर्धा | समुद्रपुर | मांडगाव | श्रीमती.सौ.वैशाली विनोद निमसडे रा.भोसा ता.समुद्रपुर जि वर्धा मो न ८८०५८६३८९१ | ३९ |
| ३१ | नागपूर | भंडारा | साकोली | सानगडी | श्रीमती रुपलता मुन्ना नागपुरे रा.सानगडी त.साकोली जि. भंडारा ९७६४०९७७१८ | ३९ |
| ३२ | नागपूर | गोंदिया | अर्जुनी/मोर. | चान्ना/बाक्टी | श्रीमती आशा राजकुमार मेश्राम मु. बाक्टी, | ३८ |
| ३३ | नागपूर | चंद्रपूर | चंद्रपुर | घुग्घुस | श्रीमती उषा अनिल वानखेडे, घुग्घुस, मो.नं.७२१८८६०३९६ | ४० |
| ३४ | नागपूर | गडचिरोली | चामोर्शी | घोट | श्रीमती इंदिरा संजय सोनटक्के, गाव निकतवाडा मो.न. ९३२५१६५८९१ | ३८ |

# 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान

"स्पर्श" खरंतर शब्दशः अर्थ घेतला तर 'टच', संपर्कात येणे, त्वचेला हात लावणे म्हणजेच स्पर्श करणे. कुष्ठरूग्णांच्या संदर्भात स्पर्श म्हणजे त्याच्या अस्तित्वाला, समाजामधील त्याच्या प्रतिष्ठेला, त्याच्या स्थानाला स्पर्श करणे. त्याच्याविषयी समाज मनामध्ये असलेली अंधश्रद्धा, गैरसमज, भीतीला दूर करणे या दृष्टीने राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमामध्ये "स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान" दरवर्षी दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या पंधरवाड्यामध्ये राबविण्यात येते. या अभियानाचा मूळ उद्देश कुष्ठरोग आजाराविषयी समाजामध्ये शास्त्रोक्त माहितीचा प्रचार प्रसार करणे हा आहे.

कुष्ठरोग पुरातन काळापासून भारतामध्ये अस्तित्वात असलेला आजार असून त्याविषयी समाजामध्ये अजूनही गैरसमजुती, अंधश्रद्धा, भ्रामक कल्पना पसरलेल्या आहेत. पूर्वी या आजारावर उपाय उपलब्ध नसल्याने कुष्ठरुग्णांना कुष्ठरोगामुळे विकृती येत असे. परंतु सन १९५५ मध्ये राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम सुरू झाला. त्यानंतर १९८२ मध्ये बहुविध औषधोपचार (एम. डी. टी.) शंभर टक्के खात्रीशीर रामबाण औषध कार्यक्रमामध्ये समाविष्ट करून राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम आजतागायत आपण राबवित आहोत. त्यामुळे बहुविध औषधोपचार आज सर्वच भारतीयांसाठी सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपलब्ध आहे. त्यामुळे आता भारतामध्ये कुणालाही कुष्ठरोग आजारामुळे विकृती येऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

परंतु विकृतीमुळे या आजाराविषयी समाजामध्ये पूर्वीच्या काळी जी भीती होती,ती अद्यापही कायम आहे. हा आजार म्हणजे पूर्वजन्मीच्या पापकर्माचे फळ अशा अनेक प्रकारच्या भ्रामक कल्पना समाजामध्ये अजूनही कायम आहेत. कुष्ठरुग्णा प्रति समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन समानतेचा नाही. त्यामुळे कुष्ठरोगाची लक्षणे असलेली व्यक्ती कदाचित आजाराबाबत माहिती असून सुद्धा स्वतःहून तपासणी करून घेत नाही. मोफत औषधोपचार उपलब्ध असून सुद्धा औषधोपचार घेत नाहीत आणि त्यामुळे त्यांना विकृती येऊ शकते. अशा प्रकारे कुष्ठरोगामुळे विकृती आल्यास व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. पर्यायाने एका विकृतीयुक्त कुष्ठरुग्णामुळे भारताच्या दरडोई उत्पन्नावर परिणाम होतो. अशा प्रकारे भारताच्या सर्वांगीण प्रगतीवर विकासावर कुष्ठरोगाच्या विकृतीमुळे विपरीत परिणाम होत असतो. त्यामुळे ही विकृती येऊच न देणे याकरिता शासनासोबत समाजाने सुद्धा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

कुष्ठरोगाबद्दल मनामध्ये भीती न बाळगता शास्त्रोक्त माहिती जाणून घेणे गरजेचे आहे. कुष्ठरोगाची लक्षणे जाणवली, कुष्ठरोग निदान झाला, तरीही घाबरून न जाता शासकीय रुग्णालयांमध्ये जाऊन उपलब्ध शासकीय यंत्रणेद्वारे कुष्ठरोगाचे लवकर निदान करून घेऊन वेळीच बहुविध औषधोपचार पूर्ण करावा. काहीही अडचणी आल्यास शासकीय यंत्रणेचे मार्गदर्शन घ्यावे. खरंतर एखाद्या व्यक्तीला कुष्ठरोग होऊच नये आणि समाजातून कुष्ठरोग हद्दपार करावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. परंतु त्याहीपेक्षा गंभीर परिस्थिती म्हणजे कुष्ठरोगामुळे विकृती येणे. कुष्ठरोगामुळे विकृती येऊच न देणे यासाठी कुष्ठरुग्णांनी स्वतः सुद्धा जागरूक राहणे महत्त्वाचे आहे. सोबतच प्रत्येक कुष्ठरुग्णास भारतीय संविधानाने प्रदान केलेल्या "समानतेचा अधिकार" आहे. त्याचा तो हक्क आपण कुणीच हिरावून घेऊ शकत नाही. प्रत्येक कुष्ठ रुग्णास, त्याच्या कुटुंबास समाजाच्या मूळ प्रवाहामध्ये समाविष्ट करून घेणे आपणा सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. हे सर्व साध्य करण्यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकाची सहकार्याची भूमिका असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळेच कुष्ठरोग मुक्त भारताकडे आपण नक्कीच वाटचाल करू शकणार.

चला तर.. भेदभाव समाप्त करूया सन्मानाची वागणूक देऊया आणि कुष्ठरोग मुक्त भारत घडवूया

**डॉ. पूनम मोहोकार**

सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग),

अमरावती

# सिकलसेलमुक्त भविष्यासाठी जनतेने तपासणी करून घ्यावी

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे रिठद येथे आवाहन



वाशिम (जिमाका): सध्या महाराष्ट्र राज्यात "अरुणोदय" सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान राबविले जात आहे. सिकलसेल रक्तविकार वेळीच लक्षात आल्यास त्यावर उपचार करणे सोपे जाते, त्यामुळे नागरिकांनी मनात कोणतीही भीती न ठेवता रक्ताची चाचणी करून घ्यावी," असे आवाहन केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. श्री. प्रतापराव जाधव यांनी केले.

वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, रिठद येथे त्यांनी नुकतीच आकस्मिक भेट दिली. यावेळी त्यांनी आरोग्य केंद्राच्या कामकाजाची पाहणी करून विविध योजनांचा आढावा घेतला.

**प्रसूती सेवेचा 'रिठद पॅटर्न' चर्चेत**

या भेटीदरम्यान आरोग्य केंद्राच्या प्रसूती विभागाची आकडेवारी पाहून मंत्री महोदयांनी आश्चर्य आणि समाधान व्यक्त केले. या केंद्राचे उद्घाटन १५ ऑगस्ट रोजी झाले होते. तेव्हापासून आजवर येथे ३२ प्रसूती यशस्वीपणे पार पडल्या आहेत. विशेष म्हणजे, यातील ३१ प्रसूती एकट्या आरोग्य सेविका अनिता कुटे यांनी केल्या आहेत. अत्यंत कमी मनुष्यबळ असतानाही अनिता कुटे यांनी दाखवलेले हे समर्पण आणि तत्परता पाहून ना. प्रतापराव जाधव यांनी त्यांचे विशेष कौतुक केले व ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा हा आदर्श असल्याचे सांगितले.

**आरोग्य योजनांचा धावता आढावा**

नामदारांनी केंद्रातील प्रसूती सुविधेसोबतच क्षयरोग (TB) निर्मूलन आणि सिकलसेल तपासणी कार्यक्रमाचा सविस्तर आढावा घेतला. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या आरोग्य योजना कशा पोहोचवता येतील, यावर त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

**जनतेला आवाहन**

"सिकलसेल चाचणीसाठी घाबरण्याचे अजिबात कारण नाही. आपल्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात, ग्रामीण रुग्णालयात किंवा जिल्हा रुग्णालयात ही चाचणी मोफत उपलब्ध आहे. सुरक्षित भविष्यासाठी सर्वांनी ही तपासणी करून घ्यावी," अशी विनंती त्यांनी यावेळी केली.

या आकस्मिक भेटीमुळे आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. यावेळी केंद्रातील डॉ. विजय बल्लाळ, डॉ.भाग्यश्री कवर यांचे सोबतच आरोग्य सेवक, सेविका आणि इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# राज्यात 'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहिमेला प्रारंभ

## आदिवासीबहुल २१ जिल्ह्यांतील नागरिकांची सिकलसेल तपासणी

सिकलसेलमुक्त महाराष्ट्रासाठी आणि आदिवासींच्या सुरक्षित भविष्यासाठी राज्यातील सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये आजपासून (दि. १५ जानेवारी) 'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहिमेला प्रारंभ करण्यात येत आहे. ही मोहीम दि. ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत राबविण्यात येणार असून, नागरिक सिकलसेल तपासणीपासून कोणीही वंचित राहू नये, यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत व्यापक नियोजन करण्यात आले आहे. ० ते ४० वर्ष वयोगटातील नागरिकांच्या तपासणीवर या मोहिमेत विशेष भर देण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या सूचनेनुसार आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. सिकलसेल आजाराचे लवकर निदान, वेळेवर उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

या विशेष मोहिमेत ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, पालघर, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, धुळे, जळगाव, बुलढाणा, नांदेड, वाशिम, अकोला, छत्रपती संभाजीनगर, रायगड व हिंगोली या २१ आदिवासीबहुल जिल्ह्यांचा समावेश आहे. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागातील नागरिक तपासणीपासून वंचित राहू नयेत, यासाठी आरोग्य यंत्रणांना दक्षतेने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या मोहिमेंतर्गत मोफत सिकलसेल तपासणी, निदान, उपचार, समुपदेशन, नियमित आरोग्य तपासणी, गरजेनुसार रक्त संक्रमण तसेच टेलिमेडिसिनद्वारे तज्ज्ञांचा सल्ला अशा सुविधा शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. राज्यातील नागरिकांनी जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात सिकलसेल तपासणी करून घ्यावी, तसेच आशा स्वयंसेविका किंवा १०४ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

# लेखकांना विनंती

वाचकांचे मनोगत हे सदर लवकरच सुरु करीत आहोत,
तरी लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय ई-मेल आयडीवर अवश्य कळवावा.
**e-mail: ddhsiec.creatives@gmail.com**

- महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेत आरोग्यासंबंधीच्या विषयांवर लेख, कविता,यशकथा इत्यादी साहित्य प्रकाशित केले जाते.
- साहित्य अप्रकाशित असावे. लेख मुख्य संपादक तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.ब्युरो) राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन इमारत, आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे 411006 या पत्त्यावर पाठवावेत. लेखकांनी स्वतःचा पूर्ण पत्ता दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी लिहावा.
- केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा क्षेत्र अनुभवांवरील साहित्याला प्राधान्य देण्यात येते. फक्त मराठी भाषेतील मजकुर प्रसिद्ध होतो.
- लेख/साहित्य प्राप्त झाल्यावर निवड समितीच्या मान्यतेने साहित्याची निवड केली जाते. अस्वीकृत साहित्य परत पाठविणे शक्य होत नाही. आपले लेख कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहून किंवा टंकलिखित करुन पाठवावेत. शब्द संख्या 700 ते 800 असावी.
- अपेक्षित महिन्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर संबंधित लेख या कार्यालयास प्राप्त झाल्यास डिजाईनचे काम योग्य वेळेत पूर्ण होऊ शकते. पुढील 3 महिन्यांसाठीचे विषय पुढे दिले आहेत.

## आरोग्य पत्रिकेसाठी पुढील महिन्यांसाठीचे विषय

### फेब्रुवारी २०२६

- **४ फेब्रुवारी** — जागतिक कर्करोग दिन
- **५ फेब्रुवारी** — मौखिक आरोग्य दिन
- **१० फेब्रुवारी** — राष्ट्रीय जंतनाशक दिन
- **११ फेब्रुवारी** — जागतिक रुग्ण दिन व जागतिक युनानी दिन
- **१२ फेब्रुवारी** — प्रजनन आरोग्य जागरूकता दिन

### मार्च २०२६

- **८ मार्च** — जागतिक महिला दिन व धूम्रपान विरोधी दिन
- **९ मार्च** — जागतिक मूत्रपिंड दिन
- **१० मार्च** — गर्भधारणेतील मधुमेह जागरूकता दिवस
- **१२ ते १८ मार्च** — जागतिक काचबिंदू सप्ताह
- **१६ मार्च** — गोवर लसीकरण दिन
- **मार्च महिन्यातील दुसरा गुरुवार** — जागतिक मूत्रपिंड दिन
- **२० मार्च** — जागतिक मौखिक आरोग्य दिन

### मार्च २०२६

- **२१ मार्च** — जागतिक डाऊन सिंड्रोम दिन
- **२२ मार्च** — जागतिक जल दिन
- **२३ मार्च** — जागतिक हवामान दिन
- **२४ मार्च** — जागतिक क्षयरोग दिन

### एप्रिल २०२६

- **१ ते ७ एप्रिल** — अंधत्व प्रतिबंध सप्ताह
- **२ एप्रिल** — जागतिक ॲटीझम जनजागृती दिन
- **७ एप्रिल** — जागतिक आरोग्य दिन
- **११ एप्रिल** — जागतिक सुरक्षित मातृत्व दिन
- **१४ एप्रिल** — आयुष्यमान भारत-आरोग्यवर्धिनी केंद्र दिन
- **१७ एप्रिल** — जागतिक हेमोफिलीया दिन
- **१९ एप्रिल** — जागतिक यकृत दिन
- **२२ एप्रिल** — पृथ्वी दिन
- **२४ ते ३० एप्रिल** — जागतिक लसीकरण सप्ताह
- **२५ एप्रिल** — जागतिक हिवताप दिन

(या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ व शासन सहमत असतीलच असे नाही. तसेच लेखातील विषयाबाबत अधिक माहितीसाठी कृपया लेखकांशी संपर्क साधावा)

**पत्र व्यवहारासाठी पत्ता**

मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक
आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग,
परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस
स्टेशन समोर, येरवडा,
पुणे 411006

# ‘अरुणोदय’ सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहीम























Registered
Maharashtra Arogya Patrika (Marathi)
**RNI No. MAHMAR/2000/1736**
The date of Publication is 24th January 2026

राज्यातील
२१
आदिवासीबहुल
जिल्ह्यांमध्ये

अरुणोदय

# सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहीम

**दिनांक : १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६**

# सिकलसेल
## तपासणी करून घ्या,
# निरोगी भविष्यासाठी
## आजच पुढाकार घ्या

**तपासणी | निदान व उपचार | समुपदेशन व जनजागृती**

ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती, गोंदिया, गडचिरोली,
पालघर, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, धुळे, जळगाव, बुलढाणा, नांदेड,
वाशिम, अकोला, छत्रपती संभाजीनगर, रायगड व हिंगोली

Monthly Maharashtra Arogya Patrika is published by
Dr. Kailas B. Baviskar on behalf of Public Health Department, Government of Maharashtra at
Maharashtra State Health I.E.C. Bureau, Parivartan', Arogya Bhavan Compound, Opp. Vishrantwadi Police Station, Yerawada, Pune 411 006.